**अमरावती महानगरपालिका, अमरावती**
**दिनांक १२.०८.२०२२ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय**

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक २५ :-** महानगरपालिका द्वारा संचालित ८ उच्च प्राथमिक शाळांमध्ये वर्ग ९ वा व १० आणि एक उर्दु माध्यमिक शाळेमध्ये वर्ग ११ वा व १२ वा विज्ञान शाखा- इंग्रजी माध्यम सुरु करणे बाबत.

**ठराव क्रमांक २५ :-** महानगरपालिका द्वारा संचालित उच्च प्राथमिक शाळांमधून ज्या शाळांमध्ये पटसंख्या चांगली आहे. त्या शाळांमध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्ग सुरु करावयाचे आहे. त्यापैकी

१) मनपा उर्दु उच्च प्राथमिक शाळा क्रमांक ७, मुजफ्फरपुरा
२) मनपा उर्दु उच्च प्राथमिक शाळा क्रमांक ९, नुर नगर
३) मनपा उर्दु उच्च प्राथमिक शाळा क्रमांक १०, बडनेरा
४) मनपा उर्दु उच्च प्राथमिक शाळा क्रमांक २, अलीम नगर
५) मनपा उर्दु उच्च प्राथमिक शाळा क्रमांक ६, चपराशीपुरा
६) मनपा हिंदी उच्च प्राथमिक शाळा क्रमांक ११, भाजी बाजार
७) मनपा मराठी उच्च प्राथमिक शाळा क्रमांक १४, वडाळी
८) मनपा मराठी उच्च प्राथमिक शाळा क्रमांक १३, चपराशीपुरा

या शाळांमध्ये वर्ग ९ वा व १० सुरु करण्यास परवानगी देण्यात यावी. तसेच मनपा उर्दु माध्यमिक शाळा जमील कॉलनी या शाळेत उच्च माध्यमिक वर्ग ११ वा व १२ वा विज्ञान शाखा- इंग्रजी माध्यम सुरु करण्याची परवानगी देण्यात यावी. सदर शैक्षणिक दर्जावाढ करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाचे संच मान्यतेनुसार शिक्षक व कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात येईल. तसेच शिक्षक वर्ग, विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालय व इतर सोयी- सुविधांसाठी पहिल्या वर्षी १,१४,७०,०००/- रुपये आणि दुसऱ्या वर्षा पासून ५६,१६,०००/- रुपये खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव सर्व साधारण सभेसमोर ठेवण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा/-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा/-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

**नगरसचिव**
**महानगरपालिका, अमरावती.**